ज्ञान प्रबोधिनी

एक अभिनव शैक्षणिक प्रयोग



खंड ४, भाग ४

संघटन

अनेक कामे आपण उपजत प्रेरणेने व काही अनुभवातून आडाखे बांधून करतो. ते आडाखे भरवशाचे होऊ लागले की ते काम करण्यातील कौशल्य व कलात्मकता वाढते. मग त्या कौशल्य व कलांचे स्थल-काल-परंपरासापेक्ष शास्त्र बनायला लागते. अशा अनेक शास्त्र-परंपरांमधून स्थल-काल-निरपेक्ष, तसेच व्यक्ती आणि परंपरानिरपेक्ष, सार्वकालिक, सार्वत्रिक असे विज्ञान बनते. भौतिक शास्त्रांचे विज्ञान बनणे त्यामानाने सोपे आहे. सामाजिक शास्त्रांचे विज्ञान बनणे अवघड आहे, कारण व्यक्तींच्या स्वभावाचे व समाजाच्या रचनेचे नवनवीन पैलू सतत समोर येत असतात. संघटना बनवण्याचे कधीतरी संघटनाशास्त्र बनवता येईल आणि बनवले पाहिजे असा ज्ञान प्रबोधिनीचा आशावाद आहे.

संघटनेमध्ये व्यक्ती-व्यक्तींमध्ये जिव्हाळ्याचे संबंध असणे व व्यक्तींची एखाद्या व्यक्तीशी किंवा गटाशी बांधिलकी असण्यापेक्षा संघटनेच्या कामाशी व ध्येयाशी बांधिलकी निर्माण होणे त्याला समूहगुणविकसन म्हटले आहे. संघटना जिवंत असण्याचे लक्षण म्हणजे नवीन सदस्यांपर्यंत आणि नवीन ठिकाणी संघटना पोचत आहे. यासाठी भौगोलिक विस्तार हा संघटनाचा दुसरा पैलू मांडला आहे. संघटनेतल्या सदस्यांना परिस्थितीला प्रतिसाद देण्यासाठी पुढाकार घेणे, इतरांना हाक मारणे, जमा झालेल्या गटाला उद्दिष्टांकडे नेणे जमले पाहिजे. हे सर्व करता येणे म्हणजे नेतृत्वगुणविकसन हा संघटनाचा तिसरा पैलू. भारतभर पसरण्याची विस्ताराकांक्षा असणाऱ्या संघटनेला आपल्या अस्तित्वाने समाजातील ऐक्यभावना आणि देशाच्या भूमीची अखंडता टिकवण्याची इच्छाशक्ती वाढवता आली पाहिजे. या दोन अंगांनी राष्ट्रीय एकात्मता जोपासणे हा संघटनाचा चौथा पैलू. समाजातील ऐक्यभावना वाढवण्यासाठी सर्व सामाजिक भेदांना मूठमाती देता आली पाहिजे. समूहगुणविकसन, नेतृत्वगुणविकसन, राष्ट्रीय एकात्मता यांचे महत्त्व पुरुषांप्रमाणे स्त्रियांच्या बाबतीतही असल्यामुळे युगधर्म म्हणून स्त्री शक्ती प्रबोधन हा संघटनाचा पाचवा पैलू मांडला आहे.

संघटनाशास्त्र बनवण्याच्या दृष्टीने पूर्वतयारी म्हणून प्राथमिक माहिती संग्रहित करण्याचा प्रयत्न करणे व त्याचबरोबर ज्ञान प्रबोधिनीचा संघटना म्हणून झालेल्या विकासाचा आलेख मांडणे, असा दुहेरी उद्देश हा ग्रंथ प्रकाशित करण्यामागे आहे.

ज्ञान प्रबोधिनी

एक अभिनव शैक्षणिक प्रयोग

खंड ४ : भाग ४

संघटन

प्रकाशक :
© कार्यवाह
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

दूरभाष :
९१-०२०-२४२०७०००

ई-मेल :
contact@jnanaprabodhini.org

प्रकाशन दिनांक :
स्वामी विवेकानंद जयंती,
राष्ट्रीय सौर पौष २२, शके १९४२
दि. १२ जानेवारी २०२१

मुखपृष्ठ :
श्री. देवेन्द्र कोतवाल

मुद्रक :
प्रबोध उद्योग
१०७० शुक्रवार पेठ,
सुभाष नगर, गल्ली क्र. ५
पुणे ४११ ००२.

मूल्य :
रूपये १५०/-

ज्ञान प्रबोधिनी –
एक अभिनव शैक्षणिक प्रयोग

या ज्ञान प्रबोधिनीच्या कामाचे विविध कालखंडातील कामाचे वर्णन करणाऱ्या खंडांच्या मालिकेतील खंडांचा क्रम

खंड क्र.	कामाचा कालावधी	प्रकाशन वर्ष
खंड १	१९६२-१९७२	१९७२
खंड २	१९७२-१९८०	१९८०
खंड ३	१९८०-१९८८	१९८८
खंड ४	(१९८८-२०२१)	
	भाग १: शिक्षण	२००८
	भाग २: संशोधन	२०१३
	भाग ३: ग्रामविकसन	२०१३
	भाग ४: संघटन	२०२१

प्रस्तावना

१. पूर्वपीठिका

सुमारे सहा वर्षे विलंब झालेला 'ज्ञान प्रबोधिनी: एक अभिनव शैक्षणिक प्रयोग – खंड चार, भाग चार' अखेर प्रकाशित होत आहे, याचा मला आनंद होत आहे. 'ज्ञान प्रबोधिनी: एक अभिनव शैक्षणिक प्रयोग – खंड तीन', १९८८ मध्ये प्रकाशित झाला. त्याच्या प्रस्तावनेत म्हटले होते की खंड पहिला १९७२ मध्ये व खंड दुसरा १९८० मध्ये प्रकाशित झाल्यामुळे दर आठ वर्षांनी ज्ञान प्रबोधिनीच्या कामाचा आढावा पुस्तकरूपाने घेण्याचा पायंडा पडतो आहे. खंड तीन प्रकाशित करतानाच ज्ञान प्रबोधिनीच्या कामाचा आवाका व पसारा वाढतो आहे, त्या सगळ्याचा आढावा एका खंडात घेणे अवघड आहे, हे लक्षात आले होते. त्यामुळे, ज्ञान प्रबोधिनीच्या कामामागील तात्त्विक भूमिका मांडणारे लेख खंड तीन मध्ये मुख्यतः प्रकाशित केले होते. त्याशिवाय १९८० ते १९८८ या काळात सुरू झालेल्या नवीन उपक्रमांवरचे लेख तेवढे त्यात घेतले होते. खंड तीन मध्ये उल्लेख केलेल्या पायंड्यानुसार, खंड चार त्यानंतर आठ वर्षांनी, म्हणजे १९९६ मध्ये, प्रकाशित व्हावयास हवा होता. तथापि, कामाचा विस्तारच असा वेगाने होत होता की शिक्षण व ग्रामविकसन या दोन कार्यप्रधान दिशा आणि नेतृत्वविकसन ही उद्दिष्टप्रधान दिशा यांच्या संकल्पना तेवढ्या पुस्तिकारूपाने मांडण्याचे ठरले. त्याप्रमाणे, नेतृत्वविकसन व ग्रामविकसन यांच्या संकल्पना-पुस्तिका १९९६ मध्ये प्रकाशित झाल्या. शिक्षणावरच्या संकल्पना पुस्तिकेचे प्रारूप १९९८-९९ मध्ये तयार झाले. परंतु, फक्त तात्त्विक मांडणी पुरेशी नाही, त्याबरोबर उपक्रम कसे करायचे, त्यांची निष्पत्ती काय, यासंबंधीही लेख असावेत, असे आधीच्या दोन संकल्पना-पुस्तिकांवरून वाटत होते. अशा चार उपक्रमांवरील लेखांची भर घालून 'रूप पालटू शिक्षणाचे' ही पुस्तिका प्रकाशित व्हायला २००० हे वर्ष उजाडले.

संकल्पना पुस्तिका व त्याबरोबर संकल्पनेच्या प्रात्यक्षिकावरील लेख ही मांडणीसुद्धा पुरेशी वाटली नाही. १९९६ सालची योजना २००१ साली पूर्ण झाली. त्यामुळे, १९९६ नंतरच्या आठ वर्षांनी, २००४ यावर्षी नवीन खंड प्रकाशित करण्याला सुट्टी द्यायचे ठरले. खंड तीन नंतर तीन स्वतंत्र पुस्तिका तयार झाल्या होत्या. २००६ या वर्षी कार्यकर्त्यांच्या तीन दिवसांच्या बैठकीत असे ठरले, की खंड चार पुस्तकरूपाने प्रकाशित करूया व तो चार भागात करूया. २०१२ मध्ये ज्ञान प्रबोधिनीचा सुवर्ण महोत्सवही होत आहे व २००४ नंतर आठ वर्षांनी नवीन खंड हे सूत्र पाळायचे ठरवले तर शिक्षण, संशोधन, ग्राम विकसन आणि संघटन या चार विषयांवरील चार भाग तोपर्यंत प्रकाशित करूया. त्या योजनेप्रमाणे खंड चारचा शिक्षणावरील 'भाग एक' २००८ साली प्रकाशित झाला. सुवर्ण महोत्सव सांगता समारंभात संशोधनावरील 'भाग दोन' व ग्राम विकसनावरील 'भाग तीन' प्रकाशित झाले. या तिन्ही भागांच्या अनुक्रमणिका प्रस्तुत ग्रंथाच्या शेवटी परिशिष्ट ४ मध्ये वाचकांच्या सोयीसाठी दिलेल्या आहेत.

२. प्रस्तुत खंडाची योजना कशी झाली ?

खंड चारच्या संघटन या विषयावरील 'भाग चार' चे प्रकाशन मात्र लांबतच गेले. याचे मुख्य कारण म्हणजे संघटन या विषयाची मांडणी कशी करायची याबाबत स्पष्टता येत नव्हती. रामकृष्ण मठ आणि रामकृष्ण मिशन यांना एकत्रितपणे रामकृष्ण संघ असे संबोधिले जाते. रामकृष्ण संघाचा शंभर वर्षांचा इतिहास दोन वेगवेगळ्या पद्धतींनी लिहिलेला उपलब्ध होता. रामकृष्ण संघ हे संघटनेचे एक वेगळे प्रारूप आहे. शंभर वर्षांपूर्वी बारा-चौदा संन्याशांपासून सुरुवात होऊन, शंभर वर्षांत तो १०००-१२०० संन्याशांच्या संघटनेएवढा विस्तारला होता. एकेका संन्याशाच्या प्रशिक्षणासाठी तो संघ सुमारे आठ वर्षांची गुंतवणूक करतो. प्रबोधिनीमध्ये कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणाची एवढी बांधेसूद रचना नाही. संघटना ह्या विषयावरती पुण्याच्या डॉ. सुधीर राशिंगकर यांनी पीएच.डी. चा प्रबंध लिहिलेला आहे. त्यात अभ्यासासाठी रोटरी क्लबची संघटन पद्धती त्यांनी नमुना म्हणून निवडलेली आहे. अभ्यास पद्धतीचा तो एक उत्तम नमुना असला तरी त्याचा उपयोग मुख्यत: अन्य संशोधकांसाठीच आहे. ज्ञान प्रबोधिनीचा संघटना या विषयावरचा खंड अनेक क्षेत्रांतील कार्यकर्त्यांनी वाचावा अशी अपेक्षा आहे. त्यामुळे खंडाच्या रचनेसाठी आणखी प्रारूपे शोधली. संघटनाशास्त्र या विषयावरती मुंबईच्या रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने एक लेखसंग्रह प्रकाशित केला आहे. संघटना हा विषयच अजून भारतीय मनाला सवयीपेक्षा कुतूहलाचा जास्त आहे. कुतूहल वाटण्याइतकी आस्थाही सर्वांना आहेच असे नाही. त्यामुळे संघटनाशास्त्रावरील तात्त्विक लेखांना काही जोड आवश्यक वाटली. त्यामध्ये कामातील अनुभव, त्यावरून काढलेले निष्कर्ष, अनुभवांचे सामान्यीकरण, त्यातून मांडलेले सिद्धांत व सिद्धांतांचे नवीन कामात उपयोजन, अशा सर्वच अंगांचा समावेश असला तर संघटन हा विषय कळायला उपयोग होईल, असे संघटना या विषयावर तयार झालेले भारतातील आधीचे हे तीन ग्रंथ पाहिल्यावर वाटले.

३. सामूहिक कामाची उपजत प्रेरणा ते संघटनाशास्त्र

अनेक कामे आपण उपजत प्रेरणेने करत असतो. मग अनुभवातून काही आडाखे बांधून काम करत जातो. ते आडाखे जसे भरवशाचे होऊ लागतात, तसे ते काम करण्यातील कौशल्य व कलात्मकता वाढत जाते. मग त्या कौशल्य व कलांचे स्थल-काल-परंपरासापेक्ष शास्त्र बनायला लागते. अशा अनेक शास्त्र परंपरांमधून स्थल-काल-निरपेक्ष, तसेच व्यक्ती आणि परंपरानिरपेक्ष, सार्वकालिक, सार्वत्रिक असे विज्ञान बनते. भौतिक शास्त्रांचे विज्ञान बनणे त्यामानाने सोपे आहे. सामाजिक शास्त्रांचे विज्ञान बनणे अवघड आहे कारण, व्यक्तींच्या स्वभावाचे व समाजाच्या रचनेचे नवनवीन पैलू सतत समोर येत असतात. संघटना हा सामाजिक वा मानव्यशास्त्रांचा विषय आहे. अनुभवातून तयार झालेले आडाखे आणि अनुमाने यातून संघटना घडत जाते. अशा संघटना बनवण्याचे कधीतरी संघटनाशास्त्र बनवता येईल आणि बनवले पाहिजे असा ज्ञान प्रबोधिनीचा आशावाद आहे. संघटनावरचा खंड तयार करताना तो संघटनाशास्त्र बनवण्याच्या दृष्टीने पूर्वतयारी म्हणून प्राथमिक माहिती संग्रहित करण्याचा प्रयत्न असावा व त्याचबरोबर ज्ञान प्रबोधिनीचा संघटना म्हणून झालेल्या विकासाचा आलेखही त्यात प्रतिबिंबित व्हावा, असे दुहेरी उद्देश असा ग्रंथ प्रकाशित करण्याचा जेव्हा संकल्प केला तेव्हा मनामध्ये होता.

४. संघटनशास्त्राच्या मांडणीची पूर्वतयारी

या ग्रंथाच्या पहिल्या संपादकांना हा उद्देश स्पष्ट होईपर्यंत दुर्दैवाने त्यांना कर्करोग झाल्याचे निदान झाले व त्यातच त्यांचे निधन झाले. त्यांनी जुळवाजुळव केलेल्या साहित्यावर संपादकीय हात अजून फिरायचा होता. नव्या संपादकांना खंडाचा उद्देश समजून घेऊन, आधी जमा झालेल्या लेखांचा आढावा घेऊन, खंडाचा आराखडा नव्याने मांडावा लागला व त्यात रिकाम्या असलेल्या जागा भरून काढण्यासाठी अनेक लेखकांच्या मागे लागून लेख लिहून घ्यावे लागले. आराखड्यानुसार त्यांचे पुनर्लेखन व लेखांचे संपादन करण्यात बराच कालावधी गेला. अखेर चार विभागांमध्ये २५ लेखक आणि लेखकांचे तीन गट यांनी लिहिलेले ३१ लेख असलेला खंड आता प्रकाशित होत आहे.

प्रभावी संघटना होण्यासाठी एकेक व्यक्ती, क्षमता आणि कौशल्यांच्या अंगांनी विकसित झाली पाहिजे व त्याबरोबर तिच्यामध्ये इतरांशी जुळवून घेत, गटामध्ये काम करण्याची वृत्ती निर्माण झाली पाहिजे. पहिल्या विभागामध्ये या दृष्टीने ज्ञान प्रबोधिनीमध्ये होत असलेल्या उपक्रमांचा आढावा घेतला आहे. संघटनेशी जुळवून घेणारी व्यक्ती अधिक प्रभावी काम करणारी व्हावी यासाठी, तिची प्रेरणा वाढली पाहिजे. अशा प्रेरित व्यक्तींची संघटना अधिक परिणामकारक कशी झाली पाहिजे, ह्याचा विचार करणारी संघटनेतील तंत्रे व पद्धती यांची मांडणी दुसऱ्या विभागामध्ये केली आहे. संघटना परिणामकारक झाली म्हणजे संघटनेत नवीन नवीन व्यक्तींचा प्रवेश होत राहतो. तसेच, संघटनेच्या नित्य नैमित्तिक उपक्रमांची आवृत्ती नवीन गटांमध्ये व नवीन ठिकाणी होऊ लागते. म्हणजेच, संघटनेचा विस्तार होतो. ज्ञान प्रबोधिनी या संघटनेच्या विस्ताराचे असे वेगवेगळे नमुने विभाग तीनमध्ये आले आहेत.

५. संघटनेची व्यापक भूमिका

'रूप पालटू देशाचे' हा ज्ञान प्रबोधिनीच्या ध्येयाचा काव्यात्मक आविष्कार आहे. देशाचे रूप पालटण्यासाठी अनेक अंगांनी काम करावे लागते. ते कोणतीही एक संघटना, तिचा अखिल भारतीय विस्तार झाला तरी करू शकणार नाही. निदान २५ किंवा अधिकही अखिल भारतीय संघटना परस्पर सहकार्य करत व सुसंवाद राखत नित्य कार्यरत राहिल्या, तर देशाचे भौतिक व सामाजिक रूप पालटू शकेल, असे ज्ञान प्रबोधिनीतील चिंतन आहे. आज ज्ञान प्रबोधिनीचे नित्य काम महाराष्ट्रातील दहा-बारा गावांमध्ये चालते. प्रासंगिक काम आणखी शंभर-दीडशे गावांमध्ये चालत असेल. उपक्रमांच्या माध्यमातून संपर्काचे काम भारताच्या आठ-दहा राज्यांमध्ये कुठे नियमितपणे तर कुठे प्रासंगिकरित्या चालते. ज्ञान प्रबोधिनीचे काम अखिल भारतीय व्हायला आणखी काही वर्षे लागतील. तथापि, आत्तापासूनच प्रयत्नपूर्वक इतर संघटनांबरोबर एकत्रित काम करण्याचे अनुभव मिळवत व वृत्ती घडवत राहिले पाहिजे. त्या दृष्टीने विविध संघटनांमधील साहचर्य कसे होते, आहे व असले पाहिजे यासंबंधीचे लेख विभाग चारमध्ये आलेले आहेत.

६. संघटनाचे पाच पैलू किंवा कार्यदिशा

हा ग्रंथ तयार होत असतानाच्या काळातच ज्ञान प्रबोधिनीची संघटन या विषयावरची भूमिका अधिक

स्पष्ट झाली. संघटनेमध्ये व्यक्ती-व्यक्तींचे जिव्हाळ्याचे, आत्मीयतेचे संबंध जसे महत्त्वाचे, तसे व्यक्तींची एखाद्या व्यक्तीशी किंवा गटाशी बांधिलकी असण्यापेक्षा संघटनेच्या कामाशी व ध्येयाशी बांधिलकी असणे महत्त्वाची असते. असे आत्मीयतेचे संबंध व ध्येयाशी बांधिलकी निर्माण होण्याला समूहगुणविकसन म्हटले आहे. पण संघटन म्हणजे फक्त समूहगुणविकसन नाही. संघटना जिवंत असण्याचे लक्षण म्हणजे तीमध्ये नवीन सदस्य येत आहेत आणि नवीन ठिकाणी संघटन पोचत आहे. यासाठी भौगोलिक विस्तार हा संघटनाचा दुसरा पैलू मांडला आहे. संघटनेतल्या सदस्यांना परिस्थितीला प्रतिसाद देण्यासाठी पुढाकार घेता आला पाहिजे, इतरांना हाक मारता आली पाहिजे, आणि जमा झालेल्या गटाला उद्दिष्टांकडे नेता आले पाहिजे. हे सर्व करता येणे म्हणजे नेतृत्वगुणविकसन हा संघटनाचा तिसरा पैलू. भारतभर पसरण्याची विस्ताराकांक्षा असणाऱ्या संघटनेला आपल्या अस्तित्वाने समाजातील ऐक्यभावना वाढवता आली पाहिजे. तसेच देशाच्या भूमीची अखंडता टिकवण्याची इच्छाशक्तीही समाजामध्ये निर्माण करता आली पाहिजे. या दोन अंगांनी राष्ट्रीय एकात्मता जोपासणे हा संघटनाचा चौथा पैलू. समाजातील ऐक्यभावना वाढवण्यासाठी भाषिक, प्रांतीय, सांप्रदायिक व जातीय भेदांना मूठमाती देता आली पाहिजे. पण समूहगुणविकसन, नेतृत्वगुणविकसन, राष्ट्रीय एकात्मता यांचे महत्त्व भाषिक, प्रांतीय, सांप्रदायिक व जातीय गटांशिवाय, पुरुषांप्रमाणे स्त्रियांच्याही बाबतीत आहे. त्यामुळे युगधर्म म्हणून स्त्री शक्ती प्रबोधन हा संघटनाचा पाचवा पैलू आहे. या पाच पैलूंना कार्यदिशा असा शब्द ज्ञान प्रबोधिनीत वापरतो.

या खंडाची रचना निश्चित झाली तेव्हा संघटनाचे हे पाच पैलू स्पष्ट व्हायचे होते. पण या पाचही पैलूंनी किंवा कार्यदिशांनी काम आधीपासून होत असल्यानेच ते स्पष्ट झाले. या सर्व कार्यदिशांचा उल्लेख जरी या खंडात स्पष्टपणे झालेला नसला तरी चारी विभागांतील लेखांमध्ये या कार्यदिशांनी होणाऱ्या कामांचाच निर्देश असल्याचे वाचकांच्या लक्षात येईल.

७. ग्रंथाची मांडणी

खंड ४ च्या या भागातील चारही विभागांच्या सुरुवातीला प्रस्तावनात्मक लेख आहेत. त्या लेखांमधून आजपर्यंत ज्ञान प्रबोधिनीमध्ये गोळा झालेल्या संघटनाच्या अनुभवाचा संग्राह्य सारांश आला आहे. सगळा खंड जरी अजून अमराठी वाचकांना वाचायला उपलब्ध होऊ शकला नाही तरी या विभागांच्या प्रस्तावनांचे इंग्रजी भाषांतर परिशिष्टात दिले आहे, त्यावरून त्यांना या खंडातील आशयाचा काहीसा अंदाज येऊ शकेल. ज्ञान प्रबोधिनीच्या विद्यमान व भावी कार्यकर्त्यांना या खंडातून 'देशातील संस्थात्मक जीवन समृद्ध करणारी संघटना' या ज्ञान प्रबोधिनीच्या स्वरूपाचा काहीसा अंदाज येऊ शकेल. अन्यही सामाजिक संघटनातील कार्यकर्त्यांना हा खंड ज्ञान प्रबोधिनीच्या प्रयोगाचा संदर्भग्रंथ म्हणून उपयोगी पडू शकेल. यात मांडलेले आडाखे व अनुभव यातून भावी काळात 'भारतीय संघटनाशास्त्र' निर्माण व्हावे, अशी अपेक्षा आहे.

गिरीश श्री. बापट
संचालक

संदर्भ पाहण्यासाठी सूचना

काही लेखांमध्ये विविध ठिकाणी **'संदर्भ ()'** असे ठळक ठशात छापलेले आहे. त्या-त्या लेखाच्या शेवटी त्या संदर्भाचे सविस्तर विवरण दिलेले आहे, व सोबत क्यूआर संकेत छापलेला आहे. तो क्यूआर संकेत स्कॅन केल्यास, प्रबोधिनीने छापलेल्या ज्या पुस्तिकेतून तो संदर्भ घेतला आहे, ती पुस्तिका उपलब्ध करून देणारी लिंक आपल्या स्कॅनरमध्ये उघडेल. अशा सर्वच संदर्भांच्या पुस्तिका एकाच क्यूआर संकेताद्वारे उपलब्ध केल्या असून, त्या-त्या लेखाच्या संदर्भात योग्य ती पुस्तिका निवडून, ती पाहावी.

हाच **सामाईक क्यूआर संकेत** सोयीसाठी येथेही दिला आहे.

अनुक्रमणिका

विभाग १
व्यक्ती ते संघटना

❖ **प्रस्तावना** ०३

१) **जास्वंद : युवतींचा कौशल्य-प्रशिक्षण वर्ग**
सुवर्णा गोखले ०७

२) **स्थानिक समस्या-निवारण : ग्रामसंघटन**
विवेक गिरिधारी १०

३) **अभ्यास देशस्थितीचा समतोल चालो**
आकाश चौकसे १४

४) **विकसन हेच तत्त्वज्ञान : समन्वयाची कार्यपद्धती**
विवेकराव कुलकर्णी २३

५) **विज्ञान दले**
नचिकेत नित्सुरे २७

६) **इवलेसे रोप**
अनघा लवळेकर ३५

❖ **व्यक्तिविकासाच्या प्रगत टप्प्यावरील प्रक्रिया** ४४

७) **कार्यकर्त्याचे गुण**
गिरीशराव बापट व
स्वर्णलता भिशीकर ४७

८) **प्रतिज्ञाग्रहण : कार्यकर्ताघडणीचा आत्मा**
आदित्य शिंदे ६०

९) **पूर्णवेळ कार्यकर्ता**
स्वर्णलता भिशीकर ६६

विभाग २
संघटनान्तर्गत व्यवहार

❖ **प्रस्तावना** ७१

१०) **प्रबोधिनीतील संघटनविचारांचे पैलू**
आशुतोष बारमुख ७५

११) **समूहगुणविकसनाचे टप्पे**
अखिलेश कसबेकर ८६

१२) **कार्यकर्त्यांची वैचारिक घडण**
सौगंध देशमुख ९१

१३) **वर्षारंभ आणि वर्षान्त**
नचिकेत नित्सुरे ९७

१४) **शोधबोध**
नचिकेत नित्सुरे १००

१५) **मनोगत-लेखन**
शुभंकर केळकर ११०

१६) **कार्यकर्त्यांशी संवाद**
वीणा लिमये ११५

१७) **निकोप संघटनाचा पाया : सहविचार**
गिरीशराव बापट व
अनघा लवळेकर १२३

१८) **संघटनाभिमुखता आणि अन्य अभिमुखता परस्परसंबंध**
मेधाविनी वाटवे १३३

विभाग ३
संघटनेचा विस्तार

❖ **प्रस्तावना** १४३

१९) पौरोहित्यातून प्रबोधिनीचा प्रसार
मनीषा शेटे १४७

२०) गणेशोत्सव
अभिषेक जोग १५५

२१) छात्र प्रबोधनचे विस्तार कार्य
महेंद्र सेठिया १६०

२२) प्रवास विस्तार केंद्रांचा
श्रुती फाटक १६८

२३) प्रशासकीय अधिकारी : घडण आणि गटबांधणी
सविता कुलकर्णी १७४

२४) नागरी वस्ती अभ्यासगट : समाज-दर्शन
हर्षा किर्वे १८५

२५) बचत गटांमधून नेतृत्वविकसन
सुवर्णा गोखले १९३

विभाग ४
प्रबोधिनी व इतर संघटना सहसंबंध

❖ **प्रस्तावना** २०५

२६) हिंदुस्थानातील संघटन प्रयत्नांचा इतिहास
यशवंतराव लेले २०९

२७) विविध संघटनांशी सहकार्य
सुभाषराव देशपांडे २१७

२८) पूर्वांचल स्नेहसिंचन : अभ्यास, मैत्री आणि शिक्षण संवाद !!!
राष्ट्रीय एकात्मता कार्यदिशा समिती २२७

२९) चिंतनगट ते चळवळ
गिरीशराव बापट २३५

३०) चळवळ वंचितांच्या शिक्षणाची : साखरशाळा
प्रकाश रणनवरे २४०

३१) मावळ तालुक्यातील शाळांचे संघटन
व्यंकटराव भताने २४६

❖ **परिशिष्टे**

परिशिष्ट १ – प्रस्तुत खंडातील विभागांच्या प्रस्तावनांचे इंग्रजी अनुवाद २५३

English Versions of Prefaces to the Sections of Present Volume 253

परिशिष्ट २ – संघटनेतील सदस्यांची आकडेवारी २६९

परिशिष्ट ३ – प्रथम तीन खंडांचा परिचय २७८

परिशिष्ट ४ – खंड ४ च्या भाग १, २ व ३ या भागांच्या अनुक्रमणिका २८०